महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.:- म.आ/मा.व्य/१५५
दिनांक:- 05/05/2020

## कार्यालयीन आदेश

**विषय:- बालेवाडी क्रिडा संकुल येथील क्वारंटाईन /कोव्हिड केअर सेंटर येथील व्यवस्थेबाबत**
**संदर्भ :- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५**
**२. साथरोग प्रतिबंध अधिनियम १८५७**

श्री. छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा संकुल, बालेवाडी येथे IQC / CCC केंद्र सुरू करण्यात येत असून सदर केंद्राची क्षमता सुमारे १५०० व्यक्तींची असल्याने या ठिकाणी अत्यंत जबाबदार अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

सबब श्री. संदीप कदम, महापालिका सहाय्यक आयुक्त, कोथरूड क्षेत्रिय कार्यालय यांची बालेवाडी क्रिडा संकुल या CCC केंद्राचे मुख्य नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. श्री. संदिप कदम, कोथरूड क्षेत्रिय कार्यालय यांनी बालेवाडी येथील CCC केंद्राचे व्यवस्थापन (भोजन व्यवस्था, स्वच्छता, प्रशासकीय कामकाज) व दैनंदिन कामकाज तसेच वैद्यकीय अधिकारी यांचे समवेत समन्वय ठेवण्याचे काम करावे.

सदर केंद्रावर आवश्यक ते साहित्य खरेदी, नियंत्रण व व्यवस्थापन यांची संपूर्ण जबाबदारी उपरोक्त नियंत्रक अधिकारी यांची रहाणार आहे. सदर आदेश हा उपरोक्त संदर्भांकीत अधिनियमान्वये काढण्यात आलेला असून नियोजित कामात कोणतीही कुचराई होणार नाही याची संबंधीत अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

(शेखर गायकवाड)
**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका